| CNR No.MHKO200002602022 | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | – | २७ | ०७ | २०२२ |
| नोंदणी तारीख | – | २८ | ०७ | २०२२ |
| निकाल तारीख | – | ०७ | ०५ | २०२६ |
| कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | ०३ | ०९ | ११ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ४७/२०२२.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक ६१/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– ०७ मे २०२६**

शाहुवाडी पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१००/२०२१ भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत शाहुवाडी पोलीस ठाणे,<br>ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. सौ. व्ही. डी. माने |
| आरोपी | १. | यशवंत बाबु कांबळे, व.व.६२, |
| | २. | दिलीप तुकाराम फाटक, व.व.६०, |
| | ३. | प्रकाश तुकाराम फाटक, व.व.५१, |
| | ४. | दर्शना दिलीप फाटक, व.व.५२, |
| | ५. | अश्विनी अशोक फाटक, व.व.३८, |
| | | सर्व रा. करंजफेण, ता. शाहुवाडी, |
| | | जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही. एस. पाटील |

**भाग–ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०६.०४.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०७.०४.२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २७.०७.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०८.०९.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २२.०८.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | यशवंत बाबु कांबळे, | १५/०६/२०२२ | १५/०६/२०२२ | भा.दं.सं.कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |
| २. | दिलीप तुकाराम फाटक | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ३. | प्रकाश तुकाराम फाटक | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ४. | दर्शना दिलीप फाटक | | | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ५. | अश्विनी अशोक फाटक | | | | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | कृष्णात पांडूरंग कांबळे | फिर्यादी | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | राजाराम लक्ष्मण कांबळे | साक्षीदार | ४९ |
| ३. | मधुकर कृष्णा पवार | तपासी अंमलदार | ५३ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २६ | फिर्याद |
| २. | २७ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | ५४ | तपासाचा लेखी ओदश |
| ४. | ५५ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| –– | निरंक | –– |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १४ | दोषारोप |
| ३. | १५ ते १९ | आरोपींचे निवेदन |
| ४. | ५६ ते ६० | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | निवेदन |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (दिनांक ०७ मे२०२६ रोजी घोषित)

आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी हे करंजफेण, ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर येथील राहणारे असुन त्यांची करंजफेण येथील बौध्दवाडा येथे जमीन गट नं.१४२ वरुन फिर्यादीत व चुलते यशवंत बाबु कांबळे यांचेत वाद आहे. सदर गट नंबरची आठ दिवसांपुर्वी भुमी अभिलेख शाहुवाडी यांनी सदर गटाची मोजणी केली आहे. दि.०६/०४/२०२१ रोजी सायंकाळी ०८.३० वाजताचे सुमारास करंजफेण येथे किराणा मालाच्या दुकानात मेणबत्ती घेवुन घरी येत असताना फिर्यादीचे चुलते यशवंत बाबु कांबळे यांनी फिर्यादीला विचारले की, तुला मी दोन दिवसापुर्वी त्याची व दिलीप फाटक याच्यात मिटींग झाली असुन फिर्यादीच्या रानातुन रस्ता करायचा आहे असे म्हटल्यावर फिर्यादी यांनी त्यास मला हे मान्य नाही असे म्हणाले असता चुलते यशवंत यांनी तु कुठुन जाणार पुढे फाटकांचे रान आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यास मला जमणार नाही असे म्हणुन चालत घराचे दारात गेले असता दिलीप तुकाराम फाटक हा पाठीमागुन येवुन फिर्यादीच्या टी-शर्टची कॉलर पकडुन फिर्यादीला पाठीमागे ओढले त्यावेळेस फिर्यादी पाठीमागे पडले व त्यावेळी त्यांनी फिर्यादीची कुबडी हातात घेवुन फिर्यादीच्या डोकीत मारली त्यानंतर पुन्हा फाटक याने फिर्यादीला कुबडी

मारत असताना बचावासाठी फिर्यादीने त्याचा उजवा हात आडवा केला असता कुबडी फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोप–याजवळ लागली. त्यानंतर फिर्यादीचे चुलते यशवंत कांबळे याने फिर्यादीला लाथा मारुन दोन कानफाडीत मारल्या व प्रकाश फाटक याने फिर्यादीच्या अंगावर धावुन येवुन फिर्यादीला दोन कानफाडीत मारल्या. त्यावेळी फिर्यादीने मोठ मोठयाने आरडा ओरडा केला तेव्हा फिर्यादीची आई जनाबाई ही घरातुन बाहेर येवुन तिने माझ्या पोराला तुम्ही सपविता काय असे म्हणुन फिर्यादीला सोडवत असताना अश्विनी अशोक फाटक या थेरडीच्या अंगात मस्ती आहे असे म्हणुन फिर्यादीच्या आईच्या कानफाडात मारली. त्यावेळी तेथे दर्शना दिलीप फाटक हिने फिर्यादीच्या आईच्या कानफाटात मारुन म्हणाली की, तुझ्या लेकाला इथच दारात गाडीन व तुला पण ठार मारीन असे म्हणुन ते सर्वजन निघुन गेले. त्यावेळी फिर्यादी त्याच्या आईस घेवुन घराच्या कट्टयाजवळ बसले. त्यावेळेस फिर्यादीस डोक्यास, कपाळा जवळ जखम होवुन रक्ताचे थेंब पडत होते. त्यानंतर फिर्यादीने आईस आता रात्रीचे कोठे जायचे ? काय असेल ते सकाळी बघु असे म्हणुन आईस घेवुन घरात गेला व जखमेवरती हळद लावुन झोपले व सकाळी उठुन एस.पी. कोल्हापूर यांना भेटुन घडलेला प्रकार सांगुन त्यांनी त्यांना शाहुवाडी पोलीस ठाणे येथे तक्रार दया असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाणेत आले असता पोलीसांनी त्यांना दवाखाना वर्दी घेवुन औषधोपचारासाठी ग्रामीण रुग्णालय येथे पाठविले व तेथुन उपचार घेवुन शाहुवाडी पोलीस ठाणे येथे आले.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द शाहुवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र.१००/२०२१ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व

केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१४ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.१५ ते १९ वर नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण तीन साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंती वरुन तसेच पुरेशी संधी दिलेनंतर नि.क्र.१ कडील दि.१८/०४/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.५६ ते ६० कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **<u>प्रश्नबिंदू</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.०६/०४/२०२१ रोजी सकाळी ०८.३० वाजताचे सुमारास कारंजफेण, ता. शाहुवाडी, जि. | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | कोल्हापूर येथे आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण किंवा हल्ला करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी नं.२ दिलीप यांनी गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा कुबडीने फिर्यादी कृष्णात यांना डोक्यात व उजव्या हातावर मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी क्रं.१ यशवंत यांनी फिर्यादी कृष्णात यांना लाथा मारुन व कानफाडीत मारुन, आरोपी क्रं.३ प्रकाश यांनी फिर्यादी कृष्णात यांना कानफाडात मारुन, आरोपी क्रं.४ दर्शना व आरोपी क्रं.५ अश्विनी यांनी साक्षीदार जनाबाई यांना कानफाडात मारुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड सहिता कलम ३२३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ६. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी क्रं.४ दर्शना यांनी फिर्यादीस " तुझ्या लेकाला इथच गाडीन व तुला पण ठार मारीन" अशी जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | |
| ७. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोषमुक्तता करणेत येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

०८. प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.२ कृष्णात पांडूरंग कांबळे **(फिर्यादी/नि.क्र.२५)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, ते आरोपी क्रं.१ ते ५ यांना ओळखतात कारण आरोपी करंजफेण या गावी राहणारे आहेत. आरोपी क्रं.१ यशवंत कांबळे हे त्यचे चुलत चुलते आहेत. आरोपी क्रं.१ व त्यांच्यात गट नं.१४२ मधील शेतीवरुन वाद आहे. दि.०६/०४/२०२१ पूर्वी यशवंत कांबळे व दिलीप फाटक यांच्यामध्ये रानातून रस्ता करण्याच्या कारणावरुन बैठक झाली होती. त्यानंतर दि.०६/०४/२०२१ रोजी दारातून जात असताना यशवंत कांबळे यांनी त्याला रात्री ८.३० च्या सुमारास बोलावून सांगितले की, आम्ही रस्ता करणार ओहोत. त्यावर साक्षीदाराने त्यांना सदरची बाब साक्षीदाराला मान्य नसलेचे सांगितले. ते गावात पायी पोहचल्यानंतर पाठीमागून दिलीप फाटक यांनी त्याची कॉलर पकडून त्याला पाठीमागे ओढले व त्याच्या हातातील स्टीलची कुबडी घेवुन फिर्यादीच्या उजव्या बाजूवर डोक्यात मारली. त्यानंतर यशवंत कांबळे यांनी लाथाने मारहाण करुन फिर्यादीच्या दोन ते तीन वेळा कानफाडीत मारली.

०९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ कृष्णात पांडूरंग कांबळे यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रकाश फाटक यांनी देखील त्याच्या कानफाडात मारली. आरडोओरडा झाल्याने त्याची आई जनाबाई दारात आली. त्यानंतर त्यांना देखील आरोपी अश्विनी फाटक व दर्शना फाटक यांनी त्याच्या आईच्या कानफाडात मारुन तुझा लेकाला दारात गाडीन, या म्हातारीच्या थेरडीच्या अंगात मस्ती लय आहे असे म्हणुन त्याच्या आईच्या कानफाडात मारली. त्याच्या डोक्याला जखम झाल्याने ते त्यांच्या घराच्या कट्ट्यावर बसून राहिले. रात्रीची वेळ असलेने ते उपचाराकामी बाहेर जावून शकले नाही. त्यामुळे जखमेवर त्याने हळद लावली. त्यानंतर दुस–या दिवशी त्याने एस.टी.ने एस.पी. ऑफीस, कोल्हापूर येथे गेले व त्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांनी त्याला शाहुवाडी पोंलीस स्टेशनला फिर्याद देणेस सांगितले. त्यानंतर त्याने शाहुवाडी पोलीस स्टेशनला आले नंतर पोलीसांनी त्याला सरकारी

दवाखाना मलकापूर या ठिकाणी पाठविले. त्यानंतर त्याने पोलीस स्टेशनला येवून फिर्याद (नि.क्र.२६) दिली. छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.२७ आहे. त्यांना ज्या स्टीलच्या कुबडीने मारहाण झाली ती ते वापरत असुन आज देखील त्याच्या आधारे ते न्यायालयात आले आहेत. त्यांच्या ताब्यात असलेल्या कुबडीने त्यांना मारहाण झाली आहे. आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ राजाराम लक्ष्मण कांबळे **(साक्षीदार/नि.क्र.४९)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, ते फिर्यादी कृष्णात कांबळे यांना ओळखतात तसेच आरोपी क्रं.१ ते ५ यांना ओळखतात कारण ते त्यांच्या गावातील राहणारे आहेत. दि.०६/०४/२०२१ रोजी रात्री ते कोकणात कामाला गेले होते. त्या दिवशी काय घटना घडली या विषयी त्यांना माहिती नाही. असे काही घडले नाही की दि.०६/०४/२०२१ रोजी रात्री ०८.३० वाजता प्रकाश फाटक हे कृष्णात कांबळे यांना मारहाण करत होते. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपसामध्ये विचारतात तसे प्रश्न विचारुन देखील आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द होईल असा पुरावा आला नाही.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ मधुकर कृष्णा पवार **(तपासी अंमलदार/नि.क्र.५३)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सन २०१८ ते २०२०–२०२१ पर्यंत ते शाहुवाडी पोलीस स्टेशनला सहाय्यक फोजदार म्हणुन कार्यरत होते. त्यादिवशी त्याला गु.र.नं.१००/२०२१ चा तपास करणे कामीचा लेखी आदेश (नि.क्र.५४) ठाणे अंमलदार बांबाले यांचेकडून प्राप्त झाला. लेखी आदेशासोबत फिर्याद, छापील प्रथम खबरी अहवाल प्राप्त झाले. त्यानंतर करंजफेण येथे फिर्यादीच्या घराजवळ पंचनामा करणेसाठी गेले. नि.क्र.५५ तोच आहे. पंचनामा केल्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले व मुळ कामात सामील केले. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र करुन ते प्रस्तुत कामात सामील केले. पुढील तपास पी.आय. पाटील यांनी केला.

तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र पी.आय. पाटील यांनी न्यायालयात दाखल केले. त्यांनी आरोपींना ओळखतात आरोपी क्रं.२ ते ५ न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्रं.१ यांस पाहिलेस ओळखु शकतात.

**१२.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ कृष्णात पांडुरंग कांबळे **(फिर्यादी/नि.क्र.२५)** यांचे आरोपींचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी असे कबुल केले आहे की, आरोपी क्रं. २ दिलीप तुकाराम फाटक हे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा राजारामपुरी या ठिकाणी कार्यरत आहेत. सन २०१२ ते २०१७ या काळात पंचवार्षिक निवडणूक झाली होती. त्यामध्ये आरोपी क्रं. १ यशवंत कांबळे हे ग्रामपंचायत सदस्य तर आरोपी क्रं. ४ दर्शना फाटक या सरपंच म्हणून निवडून आल्या होत्या. आरोपी क्रं. २ ते ४ हे एकाच कुटुंबातील सदस्य आहेत. शिमगा सणानिमित्त केदारलिंग देवाची पालखी सर्वत्र गावभर फिरत असते. बहुजन समाज ज्या ठिकाणी रहावयास आहे. त्या ठिकाणी सदरची पालखी येत नाही. आरोपींची त्यांच्या घराला लागून घरे नाहीत. गट नं. १४२ मध्ये यशवंत कांबळे व दिलीप फाटक यांचे काहीही क्षेत्र नाही. दि. २६.०२.२०२४ नंतर ते न्यायालयात साक्ष कामी पुन्हा आले नाहीत. शाहुवाडी गावचे सरपंच, पोलीस पाटील व गावातील अंदाजे १०० लोकांनी पोलीस निरीक्षक शाहूवाडी पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक जिल्हा कोल्हापूर, तहसिल शाहुवाडी यांच्याकडे फिर्यादीच्या गैरकृत्यामबाबत तक्रारी नोंद केल्या होत्या. नि. ३१ ला त्यांनी आरोपींचा जामीन अर्ज रद्द व्हावा या आशयाचा अर्ज दाखल केला होता. आरोपी क्रं. २ दिलीप तुकाराम फाटक हे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा राजारामपूरी

येथे सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. त्यांच्याकडे असलेल्या कुबडीने एखादया व्यक्तीला मारहाण केली तर त्यातून गंभीर दुखापत होवू शकते. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबुल उत्तरे नोंदवली.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ मधुकर कृष्णा पवार **(तपासी अंमलदार/नि.क्र.५३)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, फिर्यादी कृष्णात पांडुरंग कांबळे या व्यक्ती विरूध्द करंजफेण गावातील इतर व्यक्तीनी वेगवेगळया तक्रारी दाखल केल्या आहेत. त्यांनी फिर्यादीच्या चारित्र्याच्या अनुषंगाने साक्षीदार, गावातील इतर लोक व सरपंच, पोलीस पाटील तसेच फिर्यादीला जे लोक ओळखतात त्यांच्याकडे चौकशी केली नाही. फिर्यादीच्या वर्तणुकीच्या अनुषंगाने गावातील इतर प्रतिष्ठीत लोकांकडे व फिर्यादीच्या शेजारील लोकांकडे त्या अनुषंगाने चौकशी केली नाही. फिर्यादीला ज्या कुबडीने मारहाण झाली असे फिर्यादीने त्याच्या पुरवणी जबाबात कथन केले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी प्रस्तुत कामात कुबडी जप्त करून घेतली नाही. फिर्यादीला वैद्यकीय अधिका–याने दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये त्याला कोणत्याही जखमा झाल्या नव्हत्या असे नमूद केले आहे. त्यांनी केवळ फिर्यादीच्या जवळच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवले आहेत असे कबुल केले आहे.

**१५.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.१ कृष्णात पांडुरंग कांबळे हे फिर्यादी असून त्यांना इतर लोकांविरूध्द पोलीस स्टेशनमध्ये जावून तक्रारी करण्याची सवय आहे. त्यांनी त्यांचे उलटतपासात असे कबुल केले आहे की, गट नं. १४२ मध्ये यशवंत कांबळे व दिलीप फाटक यांचे काहीही क्षेत्र नाही. शाहुवाडी गावचे सरपंच, पोलीस पाटील व गावातील अंदाजे शंभर लोकांनी पोलीस निरीक्षक शाहुवाडी पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक जिल्हा कोल्हापूर व तहसिल शाहुवाडी यांच्याकडे त्यांच्या

गैरकृत्याबद्दल अनेक तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यांच्याकडे असलेल्या कुबडीने एखादया व्यक्तिला मारहाण केली तर त्यातुन गंभीर दुखापत होवू शकते असे कबुल केले. साक्षीदार क्रं. २ राजाराम कांबळे यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता निरूपयोगी ठरलेली आहे. साक्षीदार क्रं. ३ मधुकर कृष्णा पवार हे तपासी अंमलदार असून त्यांनी फिर्यादीला ज्या कुबडीने मारहाण झाली असे फिर्यादीने त्याच्या पुरवणी जबाबात कथन केले आहे त्या अनुषंगाने त्यांनी प्रस्तुत कामात कुबडी जप्त करून घेतली नाही. फिर्यादीला वैद्यकीय अधिका–यांनी दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये त्याला कोणत्याही जखमा झाल्या नव्हत्या असे नमूद आहे. त्यांनी केवळ फिर्यादीच्या जवळच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवले आहेत. फिर्यादीच्या वर्तणुकीच्या अनुषंगाने त्यांनी गावातील इतर प्रतिष्ठीत लोकांकडे व फिर्यादीच्या शेजारील लोकांकडे त्या अनुषंगाने चौकशी केली नाही. सदर साक्षीदार यांनी केवळ तांत्रिक तपास करून आरोपींविरूध्द दोषारोप पत्र दाखल केल्याचे स्पष्ट होते.

**१६.** अभियोग पक्षाला वारंवार संधी देवून देखील त्यांनी प्रस्तुत प्रकरणातील इतर साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवलेली नाही. या सर्व बाबींचा विचार करता अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. तसेच घटनास्थळ पंचनामा सक्तरित्या शाबित केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही किंबहुना सुसंगत नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र अपराध केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी**

**नोंदवत आहे.**

**प्रश्नबिंदू क्र.७ करीताः**

**१७.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ६ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२३,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, प्रश्नबिंदू क्र.७ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

## आदेश

१. आरोपी क्र.१ यशवंत बाबू कांबळे, आरोपी क्र.२ दिलीप तुकाराम फाटक, आरोपी क्रं.३ प्रकाश तुकाराम फाटक, आरोपी क्रं.४ दर्शना दिलीप फाटक, आरोपी क्रं.५ आश्विनी अशोक फाटक सर्व रा. करंजफेण, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI
Date: 2026.05.07 19:05:29 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक –०७.०५.२०२६.
कळे–खेरीवडे.